Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / December 2024 / Special Issue 1 Volume III

18

# भारतातील आपत्ती व्यवस्थापन प्रकिया – एक अवलोकन

**प्रा. डॉ. जितेंद्र आनंदा माळी.**
**विभाग प्रमुख – संरक्षण आणि सामरिक अभ्यास**
**कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय, मारवड. ता. अमळनेर. जि. जळगाव.**

---

**प्रस्तावना** – मानव आणि आपत्ती यांचा संबंध अनादिकाळापासून असून त्यामुळेच मानवी जीवनात प्रचंड प्रमाणात स्थित्यंतरे घडून आलीत आणि भविष्यातही येतील. मानवाने निसर्गात केलेले हस्तक्षेप आणि त्यामुळे पर्यावरणात झालेला बिघाड यांमुळे मानवास अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. एकविसाव्या शतकात मानवाने लावलेले विविध शोध आणि मानवाचा आततायीपणा यांमुळे आपत्ती निर्माण होते. निसर्गाने किंवा मानवाने निर्माण केलेल्या संकटाचा समाज किंवा पर्यावरणावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांवर शास्त्रीय दृष्ट्या योग्य उपाययोजना करणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय. त्याअनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधात आपत्ती व आपत्ती व्यवस्थापन प्रकिया याबाबत सविस्तर मांडणी केली आहे.

**आपत्तीचा अर्थ** – “अचानक आलेले संकट किवा अरिष्ट म्हणजे आपत्ती होय.”

**आपत्तीचे प्रकार** - आपत्तीचे पुढीलप्रमाणे मुख्य तीन प्रकार पडतात. १) नैसर्गिक २) मानवनिर्मित ३) तांत्रिक आपत्ती यानुसार -

१) **नैसर्गिक आपत्ती** – भूकंप, ज्वालामुखी, जैविक आपत्ती, पूर, दुष्काळ, वादळ, चक्रीवादळ, त्सुनामी लाटा
२) **मानवनिर्मित आपत्ती** - १) दहशतवादी हल्ला २) दंगली ३) हिंसक घटना
३) **तांत्रिक आपत्ती** – औद्योगिक अपघात, आण्विक अपघात, यांत्रिक अपघात

**आपत्तीचे परिणाम – आपत्ती**चे सजीवांवर पुढीलप्रमाणे परिणाम होतात.

१. जीवित व वित्तहानी होते.
२. जनतेचे मनोधैर्य खचते.
३. महसूल व शासकीय यंत्रणेवर ताण पडतो
४. सुरक्षा यंत्रणेपुढे गंभीर धोके निर्माण होतात
५. उद्धोगधंदे, व्यापार, व्यवसाय नष्ट होतो.
६. परकीय चलन व उद्धोग-व्यापाराला धोका पोहोचतो.
७. सामाजिक व राजकीय अस्थिरता निर्माण होते.
८. समाजात धार्मिक, जातीय तेढ वाढून गुन्हेगारीत वाढ होते.
९. अवैध व्यवसायांना चालना मिळते
१०. राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येते. वगैरे

**आपत्ती व्यवस्थापन** –

अचानक उद्भवलेल्या संकटातून नागरिकांची सुटका करून, त्यांचे व मालमत्तेचे रक्षण करणे, जीवित व वित्तहानी टाळणे, आपत्तीपुर्व सूचना देणे व पुनर्वसन करणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय. थोडक्यात, “आपत्ती विषयक परीस्थितीवर नियंत्रण करणे, धोकेदायक परीस्थिती निवळणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.” (चौधरी,७,२००७) आपत्ती व्यवस्थापनाचे जनक डॉ. रॉबर्ट बुलार्ड यांना मानले जाते.

भारतातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा -

भारतात, आपत्तींचे व्यवस्थापन बहुस्तरीय दृष्टिकोनातून केले जाते. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) राष्ट्रीय स्तरावर धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करते. राज्य-स्तरीय आणि जिल्हा-स्तरीय आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या धोरणांची अंमलबजावणी करतात आणि आपत्ती प्रतिसाद प्रयत्नांचे समन्वय साधतात. ते जोखमीचे मूल्यांकन करतात, आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित करतात, जागरुकता मोहिमा चालवतात, पूर्व चेतावणी प्रणाली स्थापित करतात आणि आपत्तींच्या वेळी बचाव आणि मदत कार्यात समन्वय साधतात.

**आपत्ती व्यवस्थापन कायदा** – भारतात २००५ साली आपत्ती व्यवस्थापन कायदा पारित झाला. त्यानुसार NDMA – National Disaster Management Authority, म्हणजे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन केले गेले. त्या अंतर्गत NDRF

म्हणजे "राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल" स्थापन करण्यात आले. त्याचे ब्रीदवाक्य – National Disaster Response Force "आपदा सेवा सदैव सर्वत्र" असे असून हे दल गृह मंत्रालया अंतर्गत काम करते, त्यांचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

**आपत्ती व्यवस्थापनाचे धेय्य –** कमीतकमी नुकसान होवू देणे, जीवित व वित्तहानी टाळणे, सुविधा पुरवून पुनर्वसन करणे वगैरे.

आपत्ती व्यवस्थापनाचे उद्दिष्ट -

आपत्ती व्यवस्थापनाचे मुख्य उद्दिष्ट आपत्तींचा प्रभाव कमी करणे आणि जीवित, मालमत्ता आणि पायाभूत सुविधांचे नुकसान कमी करणे हे आहे. हे समुदायांची लवचिकता वाढविण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत विविध भागधारकांमध्ये प्रभावी समन्वय सुनिश्चित करण्यासाठी सज्जता, प्रतिसाद, पुनर्प्राप्ती आणि शमन यावर लक्ष केंद्रित करते.

**आपत्ती व्यवस्थापनाची कार्यप्रणाली -** आपत्ती व्यवस्थापन मुख्यत: ३ टप्प्यात काम करते.

१) आपत्तीपुर्व काळात कार्य

२) आपत्ती दरम्यान कार्य

३) आपत्ती नंतरचा टप्पा – पुनर्वसन कार्य

**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्य -** आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मुख्यत: 4 स्तरांवर

**१) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण -** सप्टेबर २००६ – मुख्यालय – नवी दिल्ली, अध्यक्ष – पंतप्रधान, सदस्य – सर्व राज्याचे मुख्यमंत्री, कबिनेट सचिव, अर्थमंत्री, गृह मंत्री वगैरे

**२) राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातील घटक –** अध्यक्ष – राज्याचे मुख्यमंत्री,

सदस्य – मुख्य सचिव, सर्व जिल्हाल्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व पालकमंत्री इ.

महाराष्ट्र शासनाने स्वतंत्रपणे आपत्ती व्यवस्थापन कायदा – २०१० मध्ये पारित केला. या अंतर्गत **SDRF** – State Disaster Response Force.यशदा आपत्ती व्यवस्थापन केंद्र, आरोग्य अधिकारी, इंजिनिअर, इलेक्ट्रीशियन, श्वानपथक वगैरे महाराष्ट्रात १८ तुकडया सज्ज असतात.

**३) विभागीय स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन नियोजनाचे घटक –** जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पालकमंत्री, प्रशासकीय यंत्रणा, पोलिस प्रशासन, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयातील विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते वगैरे.

**४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे अध्यक्ष –** जिल्हाधिकारी, महसुल विभाग, नगरपालिका, जिल्हा पोलीस अधीक्षक, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, दूरसंचार विभाग वगैरे

**आपत्ती नंतरची कार्यवाही –**

यात आपत्ती प्रभावित क्षेत्रांची पुनर्बांधणी आणि पुनर्रचना करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आपत्ती ग्रस्तांचे पुनर्वसन, स्थलांतर करणे, नुकसान भरपाई देणे, उदरनिर्वाहाची व्यवस्था करणे, घरे- उद्योगधंदे – व्यवसाय- बाजारपेठांची पुन:उभारणी करणे. अशी कार्ये करावी लागतात. बाधित लोकांना रोजगार किंवा भरपाईसह मदत पुरवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**आपत्ती व्यवस्थापनाची वैशिष्टे –**

१) आपत्तीचे सुयोग्य नियोजन २) योग्य खबरदारी घेवून जीवित व वित्तहानी रोखणे ३) राज्य, जिल्हा, विभाग व स्थानिक स्तरावर आपत्तीचे नियोजन करणे. ४) त्वरित मदत व बचाव कार्य करणे ५) आपत्ती नंतर मदत व पुनर्वसन कार्यात सहभाग घेणे.

**विविध संस्था मदत –**

आपत्ती व्यवस्थापन कार्यात पुढील शासकीय संस्था मदत करतात. १) शासकीय महसूल विभाग २) पाटबंधारे विभाग ३) जलसंपदा ४) सार्वजनिक बांधकाम ५) यशदा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ६) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्र ७) केंदीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ८) गृह मंत्रालय ९) विविध सामाजिक संगठना १०) पोलिस प्रशासन वगैरे.

**आपत्ती व्यवस्थापन निधी –**

आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ मधील कलम- ४६ (१) नुसार सरकारने आपत्ती निवारणार्थ निधी देण्याची तरतुद आहे. या निधीचा वापर आपत्तीची तिव्रता कमी करणे, सामना करणे, बचाव कार्य, मदत, पुर्नवसन, कर्मचारी वेतन वगैरेसाठी वापरावा अशी तरतुद आहे.

**आपत्ती व्यवस्थापन कायद्यातर्गत गुन्हे व दंड –** राष्ट्रीय आपत्ती निवारण कायदा -२००५ अंतर्गत प्रकरण १० मधील कलम ५१ ते ५८ मध्ये गुन्हे व दंडाची तरतूद आहे. त्यानुसार खोटी माहिती देणे, सरकारी कामात कसूर, अडथळा, अफवा पसरविणे, भीतीचे वातावरण निर्मिती वगैरे साठी १, ३, ५ वर्षे कारावास व दंडाची तरतूद आहे.

**आपत्ती व्यवस्थापनात भारतीय हवाई दलाचा सहभाग** – कोणत्याही प्रकारच्या आपत्तीला सामोरे जाऊन आपत्ती व्यवस्थापनात मदतीसाठी भारतीय हवाई दल सदैव सज्ज असते. विविध आपत्तीला तोंड देण्यासाठी भारतीय हवाई दलाकडे अपाचे, चिनकू, ध्रुव, चेतक, चिता, अशी हेलिकॉप्टर तर वाहतुकीसाठी ग्लोबमास्टर, सी -१७, सी१३०, बोईंग ७३७, एचएस-७४८, अशी शक्तीशाली विमाने आहेत. वायुसेना आपत्ती काळात विविध ऑपरेशन राबवून, नागरीकांना एअर लिफ्ट करुन सुखरुप बाहेर काढणे, जखमींवर त्वरीत औषधोपचारासाठी इतरस्त्र हलविणे, पुरग्रस्त भागात अन्नाची पाकिटे टाकणे, आपत्तीग्रस्त भागात सर्व प्रकारची मदत त्वरीत पोहचविणे अशी महत्वाची भुमिका पार पाडते.

**भारतातील काही आपत्ती व्यवस्थापन ऑपरेशन -**

१. **ऑपरेशन राहत** – १६ जून २०१३ रोजी उत्तर भारतात मोठया प्रमाणावर पुरग्रस्त भागातून नागरीकांना सुखरुप बाहेर काढण्यासाठी ऑपरेशन राहत वायुसेनेने राबविले होते.
२. **ऑपरेशन सहयोग -** सन २०१८ मध्ये भारतीय सैन्याने केरळ मधील पुरग्रस्तांच्या सुटकेसाठी राबविले होते. यात नागरीकांची जीवित व वित्तहानी टाळून पुर परिस्थितीवर नियंत्रण ठेवले होते.
३. **ऑपरेशन ब्लॅक टोरनाडो -** मुंबई मध्ये २६-२९ नोव्हेंबर २००८ दरम्यान लष्कर-ए-तय्यबाच्या दहशतवादी संघटनेने मुंबई येथील हॉटेल ताज, छ. शिवाजी महाराज टर्मिनल वर केलेल्या अतिरेकी हल्यातून नागरीकांना सुखरुप बचावासाठी राबविले गेले होते.
४. **ऑपरेशन सी वेव** – २६ डिसेंबर २००४ मध्ये भारताच्या हिंदी महासागराच्या द. पुर्वेस सिमेल्यू बेटाजवळ समुद्रात भुकंप होवून त्सुनामी लाटांची निर्मिती होवून दक्षिण भारतात पुरस्थिती निर्माण झाली होती. यावेळी भारताच्या अंदमान निकोबार व्दिप समुहांमधील नागरीकांना एअर लिफ्ट करुन सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्यासाठी भारतीय वायुसेनेने २ जानेवारी २००५ पर्यंत हे ऑपरेशन राबविले होते.
५. **ऑपरेशन मदत (सहयोग) -** २०१८ केरळ येथिल पुरग्रस्तांच्या सुटकेसाठी केलेले ऑपरेशन
६. **ऑपरेशन कॅक्टस -** १९८८ मालव्दिव मध्ये सत्तांतर झाल्यानंतर निर्माण झालेल्या विद्रोहा दरम्यान भारतीय नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी राबविलेले अभियान
७. **ऑपरेशन कर्नुल -** २००९- कर्नाटक व आंध्र प्रदेशात झालेल्या ढगफुटी मुळे निर्माण झालेल्या पुर परिस्थितीत नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी वायुसेनेसोबत राबविलेले संयुक्त अभियान.
८. **ऑपरेशन समुद्र सेतू २०२० -** कोविड-१९ मध्ये परदेशातील भारतीयांना परत आणले.
९. **ऑपरेशन गंगा** – २०२२ मध्ये युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांना सुखरुपपणे बाहेर काढून भारतात परत आणण्यासाठीच्या भारतीय हवाई दलाने केलेल्या कार्यवाहीला ऑपरेशन गंगा असे म्हणतात.
१०. **ऑपरेशन सिल्कुयारा** – २०२३ उत्तराखंड टनल सुरुंग हादसा ४१ मजदूर वाचविले. वगैरे

**सारांश** – आपत्ती ही एक दुर्घटना आहे, ज्यामुळे नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होते . युनायटेड नेशन्सच्या मते, आपत्ती म्हणजे "अचानक किंवा मोठ्या दुर्दैवाची घटना ज्यामुळे समाज किंवा समुदायाचे मूलभूत फॅब्रिक आणि सामान्य कार्य बिघडते" आपत्ती व्यवस्थापनाला भारताच्या धोरणात्मक चौकटीत महत्त्वाचे स्थान आहे कारण ते गरीब आणि वंचित लोक आहेत जे आपत्तीमुळे सर्वात जास्त प्रभावित होतात. आपत्तींमुळे सामाजिक-आर्थिक विकास मंदावतो, पुढे, गरीबांना दरिद्री बनवते आणि दुर्मिळ संसाधने, विकासापासून पुनर्वसन आणि पुनर्बांधणीकडे वळवतात. या सर्व घटकांचा विचार करून भारताने आपत्ती व्यवस्थापन कार्यावर भर देत, नागरिकांच्या हिताला व सुरक्षेला प्राधान्य दिलेले दिसून येते.

संदर्भग्रंथ सूची –

१. चौधरी ए. पी., आपत्ती व्यवस्थापन, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.२००७
२. भोळे रमेश व इतर, आपत्ती व्यवस्थापन, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.२०२०
३. मंदा मोरे, समीक्षक – ह. ना. जगताप, Disaster Management २५/११/२०२२
४. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ https://mr.wikipedia.org/s/4jb2
५. *https://www.lokmat.com/amravati/corona-disaster-management-act-applicable/.2020-04-27*
६. https://marathivishwakosh.org/63320/
https://www.nextias.com/blog/disaster-management/